# महिला सबलीकरण आणि लोकशाही

**प्रा. डॉ. सौ. निर्मला वसंतराव मोरे**, मराठी विभाग, राजे रामराव महाविद्यालय, जत
जिल्हा सांगली

---

**गोषवारा** -

भारतीय गणराज्य हे पुरुष संस्कृतीचादेशआहे. त्याला प्राचीन अशी परंपरा आहे. पण या पुरुष प्रधान व्यवस्थेला 1982 पासून कुठेतरी विरोध सुरू झाला. लोकशाहीतील स्वातंत्र्य समता बंधुता या तीन मूल्यांचा स्वीकार समाजातील सर्व स्तरावर केला गेला. पण काही समाजातील घटक हे उपेक्षित राहिले. कारण लोकशाही ही प्रत्येक क्षेत्रातील समान सहभागाशिवाय प्रत्यक्षात येऊ शकत नाही. आपल्या देशातील स्त्री आणि पुरुष निम्मे निम्मे आहेत. लोकशाहीचा मूळ स्तोत्र असा की महिलांना त्यांचे हक्क आणि अधिकार मिळावेत. यासाठी महिलाचा लोकशाहीत सहभाग वाढविण्याची गरज आहे. आज फक्त केवळ आठ टक्केच विकास झाला आहे. त्यासाठी शासन अनेक योजना राबवित आहे. पण त्या योजना गरजू स्त्रियांच्या पर्यंत पोहोचतच नाही. त्याला मूर्त स्वरूप आले नाही. लोकशाही स्त्रियांच्या पर्यंत किती प्रमाणात पोचली? त्यासाठी शासन दरबारी किती प्रयत्न कसे आणि काय केले गेले हे अभ्यासण्याचा हेतूने या या शोधनिबंधातून अभ्यास करावयाचा आहे.

**प्रस्तावना** –

महिला सबलीकरण आणि लोकशाही यांचा जवळचा संबंध आहे. महिला सबलीकरणास पोषक शासन व्यवस्था म्हणजे लोकशाही, कारण महिला ही लोकशाही व्यवस्थेचा कणा आहे. लोकशाहीत स्त्रिया 50 टक्के घटक आहेत त्यामुळे आजच्या काळात लोकशाही हे साधन आहे. तर महिला महिला सबलीकरण या साध्य आहे.ज्या देशात महिलांचा सन्मान केला जातो. म्हणजेच समान संधी, समान न्याय, समान हक्क त्या देशात खऱ्या अर्थाने लोकशाही नांदत असते.

महिला सबलीकरणाची ही संकल्पना आजच्या काळातील नाहीतर तिला पूर्वइतिहास आहे. छत्रपती शिवरायांच्या काळात स्त्रियांचे केलेली सबलीकरण आजही ते आदर्शवत आहे. त्यानंतर पाश्चिमात्य देशातही महिला सबलीकरणाची नांदी झाली.1972 72 चाली मेरी कलस्टॅनक्राफ्ट यांची मेरी कलस्टंन एविन्डीकेशन ऑफ राईट ऑफ वुमेन हे महिला सबलीकरणाच्या चिंतनाच्या पार्श्वभूमीवर पहिले पुस्तक प्रकाशित झाले. त्यात स्वातंत्र्य समता बंधुता या मानवी मूल्यांची मागणी केली जोपर्यंत महिलांना मानवी मूल्य अधिकार सुरक्षितता प्राप्त होत नाही तोपर्यंत कोणताही समाज समतावादी होऊ शकत नाही. म्हणून लोकशाही शासन व्यवस्था भारतात नांदत आहे. या शासनव्यवस्थेत महिलांची गुलामी व शोषण समाप्त करण्यासाठी शासन दरबारी प्रयत्न केले जात आहेत.

**उद्दिष्टे** –1) महिला सबलीकरण आणि लोकशाही यांच्या संकल्पना समजून घेणे.

2) भारतीय लोकशाहीतील महिला सबलीकरणाची भूमिका अभ्यासणे.

3) महिला सबलीकरण आणि लोकशाही यांचे नाते संबंध अभ्यासणे.
4) भारतीय लोकशाहीत महिला सबलीकरणाच्या योजना अभ्यासणे.
5) स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महिला सबलीकरणात झालेल्या सुधारणा जाणून घेणे.

**गृहितके** –

1) भारतीय लोकशाहीतआहेत महिला सबलीकरणासाठी आणि कायदे केले आहेत. तरी प्रत्येक स्तरांमध्ये महिला सक्षम आहेत असे दिसून येत नाही.
2) भारतीय लोकशाही शासन व्यवस्थेत महिलांसाठी अनेक कल्याणकारी योजनांचा प्रचार व प्रसार करण्यास शासन व महिला संघटन यामध्ये उत्साहदिसून येत नाही.

**संशोधन पद्धती-**

प्रस्तुत शोधनिबंधात आतील माहितीचे संकलन स्तोत्र पद्धतीने केलेआहे. याशिवाय वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे.

**महिला सबलीकरणाचीपार्श्वभूमी :**

भारतीय लोकशाहीच्या वृत्ताची स्त्री आणि पुरुष ही दोन चाके आहेत भारतीय परंपरेत पुरुषसत्ताकपद्धतीत पूर्वीच्या काळी स्त्रीला अबला म्हणून हिने दर्जाची वागणूक दिली जाई. तिला माणूस म्हणून जगण्याचा हक्क नाकारला जाईल एवढेच नाही तर पायाची दासी म्हणून हिणवले जाईल. तिला उपेक्षित समजून मनुस्मृतीत सांगितल्याप्रमाणे 'न स्वातंत्र्य ती स्त्री मर्हति' म्हणजे स्त्रियांना कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य देऊ नये त्याप्रमाणे स्त्री आजही असुरक्षित आहे. तिचे गर्भावस्थेपासूनच शोषण सुरू असते समाजातील मुलगा-मुलगी या भेदातून अनेक स्त्रीभ्रूणहत्या होत आहेत. कारण वंशाचा दिवा मुलगाच हवा या हव्यासापोटी कोणते चित्र पहावयास मिळते. याविषयी 1940 साली सीमॉन- द-बोव्हायांनी द सेकंड सेक्स या ग्रंथात स्त्री स्वातंत्र्याचे समर्थन केले आहे या ग्रंथात स्त्रियांच्या शोषणाचा इतिहास आणि संस्कृतीच्या उत्पत्तीचा आहे. त्यास नैसर्गिक प्रक्रिया समजता येणार नाही कोणतीही स्त्री बाई म्हणून जन्माला येत नाही तर तिच्यावर बाईपण लादले जाते. तिचे शोषण हेजन्मापूर्वी पासून मरेपर्यंत तिला सोसावे लागते त्यामुळे महिला समाजाचे शोषण आणि गुलामीचा अंत यातच मानवी हक्काची यशस्विता आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात काळ बदलला महात्मा ज्योतिबा फुले अणि सावित्रीबाई फुले यांच्या अथक योगदानातून स्त्री जन्माला एक कलाटणी मिळाली. ती म्हणजे स्त्री शिक्षण होय ती साक्षर झाली तिला तिच्या स्वत्वाची जाणीव आली. माणूसपणाचे आत्मभान आले. आणि आता कोणतीही स्त्री अबला न राहता सबला बनली. चूल आणि मूल या विश्वाची बंधने ओलांडून घराबाहेर पडू लागली त्यावेळी महात्मा फुले कुटुंबियांनी महिला सबलीकरणाचे क्रांतिकारक पहिले पाऊल उचलले.त्याचा परिणाम म्हणून आज स्त्रिया सर्व क्षेत्रात कार्यरत आहेत त्या बौद्धिक सबला बनले आहेत. त्यांनी अगदी शेतीपासून आर्मी पर्यंत प्रत्येक क्षेत्र काबीज केले आहे. एवढेच नाही तर अगदी

अंतराळापासून सैन्यातही त्यांनी आपले अस्तित्व निर्माण केले आहे. असे असले तरी शासनाला आज महिला सबलीकरण करण्याची काळाची गरज वाटू लागली आहे.

**महिला सबलीकरण संकल्पना** :

सबलीकरण सक्षमीकरण सशक्तिकरण असे अनेक शब्द रोज आपल्या कानावर पडत असतात.इंग्रजीत या संकल्पनेसाठी Empowerment हा शब्द प्रचलित आहे.महिला सबलीकरण म्हणजे काय महिलांमध्ये त्यांच्या क्षमतेच्या जाणीव निर्मितीबरोबरच जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे.त्यांच्या हक्काविषयी जाणीव निर्माण करणे सामाजिक आर्थिक राजकीय घडामोडी मध्ये त्यांच्याप्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभागाबद्दलची जाणीव करून देणे. त्यांना आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी करण्याची, संपत्तीत समान वाटा देण्याची, स्वतंत्र्याबद्दल व हक्काबद्दल जागृत करण्याची,मानसिक दृष्ट्या स्वावलंबी करण्याची क्रिया सक्षमीकरण होय.असे ढोबळमानाने म्हणता येईल.

महिलांना पुरुषांच्या बरोबरीने अधिकार देणे त्यांना स्वावलंबी बनवण्याकरिता त्यांच्या आर्थिक व सामाजजिकउन्नतीसचालना देणे म्हणजे महिला सबलीकरण होय. एकूणच काय स्त्रियांना स्वावलंबी बनवणे असा ढोबळमानाने अर्थ काढता येईल महिला सबलीकरणाची व्याख्या व्हिनेसा ग्रीफनने 1987 साले जागतिक महिला स्तरावरील कार्यशाळेत पुढील प्रमाणे केली आहे. ती अशी,"स्त्री सक्षमीकरण म्हणजे स्त्रीच्या अंगी निर्णय घेण्याची नियंत्रण करण्याची क्षमता मतप्रदर्शन करणे गतीशील कार्यक्रम घडवून आणणे लोकसंपर्क जनसंपर्क संस्था संपर्क आर्थिक व्यवहार यादी करण्याची क्षमता व आवड निर्माण करणे याला महिला सबलीकरण म्हणतात"

भारतीय लोकशाहीत महिला सबलीकरणाची प्रक्रिया समजून घेताना महिलांच्या गुलामीच्या ऐतिहासिक प्रक्रिया समजून घेऊन त्याचे विश्लेषण करावे लागेल. कारण भारतातील महिला सबलीकरणाची प्रक्रियाही पश्चिमेकडील व पूर्वेकडील इतर राष्ट्रांच्या महिला सबलीकरण प्रक्रियेपेक्षा पूर्णता वेगळे आहे. भारतातील महिला सबलीकरणाचा संघर्ष हा पारंपारिक रुढी-परंपरा पितृसत्ताक पद्धती जातीयवाद लिंगभेद अशा अनेक प्रकारच्या मानवी समाजाच्या विकासात स्त्री समाजाचे शोषण व गुलामी व विषमतेच्या मायाजालात फसत गेला. आधुनिक युगात मात्र भांडवलशाही वसाहतवाद आणि साम्राज्यवादी इत्यादी शोषण व्यवस्थेवर आधारित व्यवस्था होती.

1970 मध्ये एस फायर स्टोन यांचा ग्रंथ द- डायलोकीट्स-ऑफ द- सेक्स, तर के मिचेल यांच्या ग्रंथात वुमेन द लोंगेस्ट रिचोल्युशन या ग्रंथानी स्त्री पुरुष समानतेचेमहत्त्व व त्याची अनिवार्यता याकडे लक्ष वेधून घेतले आहे. शेवटी हा प्रवास अनेक उदारमतवादी, मार्क्सवादी, आधुनिकता या संकल्पनेतून महिला सबलीकरणाची संकल्पना प्रकट झाली. 1970 च्या दशकात महिला सबलीकरणाच्या कार्यक्रमांना वेगआला. 1975 हे वर्ष युनोने आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून घोषित केले. त्यानंतर जगभरात स्त्रियांच्या स्थितीची पाहणी करण्यात आली तेव्हा असे निदर्शनात आले की, जगभरातील स्त्रियांची स्थिती अत्यंत हलाखीची आहे त्यावर विचारमंथन होऊन 1975 ते 1984 हे आंतरराष्ट्रीय महिला

दशक वर्ष म्हणून घोषित करण्यात आले. त्यासाठी विविध परिषदांचे आयोजन केले. त्याच वेळी भारतातही राष्ट्रीय महिला आयोगाची 31 जानेवारी 1992 ला स्थापन करण्यात आली. त्यानंतर स्त्री मुक्ती संघटना स्थापन झाल्या. याचवेळी स्त्रीमुक्तीच्या चळवळीचे बीज पेरले गेले. त्यानंतर केंद्र शासन महाराष्ट्र राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने विविध कल्याणकारी विकास योजना कार्यान्वित झाल्या. त्यापैकी 8 मार्च 1996 रोजी महिलांचा स्तर उंचावण्यासाठी स्थायी समिती स्थापन करण्यात आली. यानुसार एप्रिल 1997 मध्ये महिला सक्षमीकरणसमिती स्थापन करण्यात आली. जास्त समितीच्या कामात महिला राष्ट्रीय आयोगाच्या शिफारशी छाननी करणे, महिला सर्वसमावेशक शिक्षण आणि वैद्यकीय मंडळावर सेवांमध्ये आणि इतर क्षेत्रात पुरेसे प्रतिनिधित्व मिळते आहे का याची खात्री केंद्र सरकारने तपासून पहावी तसेच महिला कल्याण विषयक कार्यक्रमांची अंमलबजावणी व व आढावा घेणे.

**महिला सबलीकरणासाठीलोकशाहीच्या विविध भूमिका :**

**महिला शिक्षण विषयक धोरण:**

'मुलगी शिकली प्रगती झाली' असा भारतीय लोकशाहीत स्त्री शिक्षणाचा वारसा आणि वसा अखंडपणे चालू राहिला. त्यामुळे खऱ्या अर्थाने महिला सबलीकरणाच्या दिशेने वाटचाल होऊ लागली. एक मुलगी शिकली तर सारे कुटुंब सुधारते आणि एक मुलगा शिकला तर तो स्वतःप्रगती साधू शकतो. प्रत्येक स्त्रीने शिक्षित होणे महत्त्वाचे असते. शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन महात्मा ज्योतिबा फुले राजा राम मोहन राय राजर्षी शाहू महाराज धोंडो केशव कर्वे महर्षी शिंदे यांनी स्त्री शिक्षणासाठी बंड पुकारले. बायकांनी शिकावं म्हणून पुरुषांनी पुढाकार घेऊन समाजात जागृती निर्माण करण्यासाठी जणू रणसिंग फुंकले त्यामुळे बायका शिकू लागल्या शिक्षणाची द्वारे खुली झाली मुलींसाठी स्वतंत्र विद्यालय महाविद्यालय विश्वविद्यालय निघाली. यासाठी मोफत शिक्षणाची सुविधा उपलब्ध झाले. एवढेच नाही तर मुलींना सावित्रीबाई फुले यासारख्या शिष्यवृत्ती देऊन मुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहित केले गेले. शिकणाऱ्या मुलींचे प्रमाण वाढीस लागले शिकलेल्या मुली नोकरी करू लागल्या शिक्षक प्राध्यापक वकील डॉक्टर इंजिनिअर एवढंच नाही तर त्या समाजकारण राजकारणात भाग घेऊन आपलं स्वतंत्र अस्तित्व सिद्ध करू लागल्या. याचाच अर्थ हे सिद्ध झाले आहे.

**महिला राजकीय आरक्षण :**

8 मार्च जागतिक महिला दिनाच्या मुहूर्तावर दुसरे क्रांतिकारक पाऊल म्हणजे संसदेच्या दोन्ही सभागृहात भारताच्या विधिमंडळातील त्यात 30 टक्के जागा महिलांसाठी आरक्षित करणारे घटना दुरुस्ती विधेयक 22 जून 1994 मध्ये महिला धोरण जाहीर झाले. याला स्त्री हक्काची सनद असेही म्हणतात.महाराष्ट्र राज्य आणि महिला स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये 33 टक्के आरक्षण दिले. आज महिला संपूर्ण भारत देशातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये 33 लाख सदस्य 11 लाख महिला सदस्य आहेत. सरपंच, पंचायत समिती सभापती खासदार, आमदार, राष्ट्रपती पंतप्रधान अशा

विविध पदावर महिला आज आरूढ आहेत. कारण स्त्रिया लोकशाहीचा आधारस्तंभ आहेत. पण आज लोकशाहीतअसे चित्र दिसते की राजकारणाच्या क्षेत्रात स्त्री सक्षम असूनही पुरुष प्रधान संस्कृती पुरुषप्रधान राजकारण प्रभावी ठरत आहे हे कटू सत्य आहे याचा विचार होणे आवश्यक आहे.

**महिलाची सामाजिक स्थिती व धोरण:**

आजची स्त्री शिकली, नोकरी करू लागली, आर्थिक स्वावलंबी झाली. पण मी जेव्हा नोकरीसाठी बाहेर पडते तेव्हा, ती समाजात सुरक्षित आहे का?हा प्रश्न भेडसावत राहतो. स्त्रीपुरुष समानता हे मानवतावादी तत्त्व खऱ्या अर्थाने रुजलेली दिसत नाही. स्त्रियांवरील अत्याचार दिवसेंदिवस वाढतच चाललेला आहे. ही बाब गंभीर असून याचा आढावा घेणे गरजेचे वाटते. यामध्ये हुंडाबळी, बलात्कार बळी, मुलींची छेडछाड, खून, विनयभंग असे प्रकार नित्य घडत आहेत. देशात कोठे ना कोठे एका तासाच्या आत एखाद विनयभंगाचा बळी नाहीतर यासारख्या अत्याचाराच्या घटना घडत असतात. सामाजिक दृष्टिकोनातून स्त्रियांनाही स्थान देऊन तिची शारीरिक कमतरता लक्षात घेऊन सदर स्त्रीवर विविध प्रकारचे अत्याचार करून तिला स्त्री-पुरुषांच्या मोठी ठेवण्याचा प्रयत्न चालू असतो. हे अत्याचार करणारे साक्षर निरक्षर उच्चशिक्षित धर्ममार्तंड नातेवाईक यांच्याकडूनच बलात्कारासारख्या घटना घडत आहेत.. यावेळी स्त्रियांच्या बाबतीत गुन्हेगार पुरुष व याचा ना त्यांचा विचार करत नाही. अगदी निरागस कोमल पाच वर्षापर्यंतच्या लहान मुलींच्या वर अशा घटना घडत आहेत. त्याच्या गोष्टी माणुसकीला काळीमा फासणाऱ्या आहेत.तेव्हा स्त्रीव समाजाने सजग राहणे गरजेचे वाटते.

**महिला सबलीकरणातील शासनाचे योगदान :**

महिलांच्यासाठी शासनाच्या अनेक योजना आहेत. या योजनांची पुरेशी माहिती नसल्याने त्याचा लाभ घेणाऱ्यांचे प्रमाण कमी आहे पूर्वीच्या काळापासून स्त्रियांना सत्ता अधिकार मालमत्ता पासून दूर ठेवण्यात आले होते. म्हणून स्त्रियांना सक्षम करण्यासाठी अनेक उपक्रम योजना कार्यान्वित करण्यात आल्या. महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी आर्थिक तरतुदी करण्यात आल्या. पीठगिरणीपासून ते मोठे व्यवसायापर्यंत आर्थिक स्वावलंबन व व्यवसाय उभारणीचे, विक्रय व्यवस्थापन मार्गदर्शन करते. यातून अनेक महिला स्वावलंबी बनल्या आहेत. ग्रामीण भागात बचत गटाच्या माध्यमातून कुक्कुटपालन शेळीपालन करीत आहेत. याच बरोबर बीज भांडवल योजना, सावित्रीबाई फुले कल्याण योजना, शारदा ग्राम, संजीवनी कार्यक्रम, कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया, अनेक विमा योजना अशा अनेक योजनांच्या माध्यमातून आज अनेक महिला स्वतःच्या पायावर उभ्या आहेत.

याशिवाय भारतीय लोकशाही स्त्रियांना संरक्षण देणारे अनेक कायदे आहेत. पण या कायद्यांची माहिती स्त्रियांना नसते. फक्त कायदे करून चालत नाही तर त्या कायद्यातील शिक्षा तरतुदी यांची माहिती स्त्रियांना समाजात विविध माध्यमातून दिली गेली पाहिजे. या कायद्याची परिणामकारकता स्त्रियांपर्यंत पोहोचण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण विषयक कायदा, हुंडा

प्रतिबंधक कायदा, शुभमंगल सामूहिक विवाह योजना अशा कितीतरी योजना भारतीय लोकशाहीत नांदता आहेत.

**निष्कर्ष:**

भारतातील सबलीकरणाचा इतिहास स्वातंत्र्यपूर्व काळात परजीवी आणि पुरुषजीवीआहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय लोक शाही गणराज्यात स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार केला गेला. एकोणिसाव्या शतकात महिला सबलीकरणाची गती वाढली. महिलांचे सबलीकरण करण्यासाठी शासनाने अनेक योजना राबविल्या. त्यातून महिलांचे आर्थिक व सामाजिक क्षेत्र स्थान उंचावणे. त्यांना राष्ट्रीय विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्नशील राहिले आहे. शिक्षणामुळे तिचे सक्षमीकरण झाले. तरीही समाजाचा स्त्रियांकडे माणूस म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन आढळत नाही. तेव्हा समाजाची मानसिकता बदलणे गरजेचे आहे. त्याचबरोबर प्रत्येक स्त्रीमध्ये क्षमता बुद्धी ज्ञान कशाचेही कमी नाही ही भावना तिच्यात आत्मविश्वासपूर्वक जागृत झाली पाहिजे.

आणखी एक गोष्ट मला येथे प्रामुख्याने मांडावीशी वाटते, ती म्हणजे जशा स्त्रिया लोकशाहीत शैक्षणिक सामाजिक आर्थिक स्वावलंबी बनल्या आहेत तशाच त्या शारीरिकदृष्ट्या ही सवय होण्याची गरज आहे. कारण कुटुंबात मुलगी म्हणून तिच्याकडे थोडासा कानाडोळा आई-वडिलांचा होतो. त्यामुळे तिची खाण्याचे आबाळ होते. त्यासाठी शासनाने खेळाडूं प्रमाणे मुलींनाही पौष्टिक आहार देण्याची सुविधा केली तर महिलाही सुदृढ व निरोगी होऊ शकतील. ती स्त्री सुदृढ व निरोगी असेल तर स्वतःचे स्वसंरक्षण स्वतः करू शकेल. आज ज्या निर्भया सारख्या घटना घडत आहेत.अश्या घटना घडणार नाहीत. जर असे गुन्हेगार त्याच्यात दहशत निर्माण होईल. तेव्हाच खऱ्या अर्थाने महिला सबल झाली. असे म्हणता येईल. या शिवाय शालेय जीवनात जुडो कराटे लाठी काठी प्रशिक्षण यासारखे मार्गदर्शन केले, तर त्या स्वतःचे रक्षणस्वतः करतील ज्या दिवशी महिला समाजाचे शोषण आणि गुलामी यांचा जर अंत झाला तर खऱ्या अर्थाने भारतात लोकशाही नांदेल.

**समारोप:**

भारतीय लोकशाहीरथाचीस्त्री आणि पुरुष अशी दोन चाके आहेत ती जरसमान गतीने चालली तर खऱ्या अर्थाने भारतात लोकशाही गणराज्य नांदेल. पुरुष प्रधान संस्कृतीत आजही लोकांची मानसिकता बदललेली नाही. बदल मे काळाची गरज आहे. तसेच स्त्रियांनी हे स्वतःची मानसिकता बदलावी,आत्मविश्वास वाढवावा, आत्मभानाची जाणीव निर्माण व्हावी. आपले बुद्धिचातुर्य ओळखून आपला विकास करावा. पुरुषांच्या बरोबरीने सामाजिक आर्थिक राजकीय व शैक्षणिक क्षेत्रात वाटचाल करण्यासाठी सक्षम व बनवणाऱ्या धोरणांचा पूर्ण आढावा घेऊन नवनवीन कल्याणकारी योजनांमध्ये सहभाग नोंदवला पाहिजे. तर त्या सक्षम होतील

आजच्या स्त्रीला आरक्षण देण्यापेक्षा संरक्षण देणे ही काळाची गरज आहे. सामाजिक परिवर्तनासाठी तिला मनाने व शरीराने खंबीर बनवण्यासाठी लोकशाहीने नवे पाऊल असले

*NAVJYOT /Vol. XI / Issue – II* *ISSN 2277-8063*

पाहिजे असे वाटते. शासनाबरोबरच स्त्रियांच्या सबलीकरणासाठी जागरूकपणे कुटुंब समाज शासन यांनी पुढाकार घेतला पाहिजे फक्त पुढाकार असे नव्हे तर वास्तव काय आहे हेच जाणून घेतले पाहिजे. कारण शासनाने अनेक धोरणे कायदे केले असले तरी त्यामध्ये ही अडचणी निर्माण होतात. म्हणून त्याकडे दुर्लक्ष न करता नवीन धोरणे योजनाआखून त्याची अंमलबजावणी केली पाहिजे. संदर्भग्रंथ:-

1) शहा मृणालिनी: स्त्रीचा आत्मशोध : स्नेहवर्धन पब्लिकेशन हाऊस पुणे 2000

2) प्रा. पांडुरंग मुळे : महिला सक्षमीकरण स्वरूप आणिविकास, अरुण प्रकाशन लातूर 2012

3) डॉ. भारती पाटील : स्त्रिया समाज आणि राजकारण, हर्मिसप्रकाशन सातारा 2014

4) प्रा. डॉ. रेखा माने : महिला सक्षमीकरण समस्या आणि उपाय : इशा प्रकाशन लातूर 2006